सदैव दक्ष, कार्यक्षम, कार्यतत्पर सेवा...

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

## विशेष पोलीस महानिरीक्षक
## छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र

# मा.मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मुंबई


## क्षेत्रीय कार्यालयासाठी 100 दिवसीय
## कृती आराखडा कार्यक्रम

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र, छत्रपती संभाजीनगर

| पोलीस अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण<br>फोन नं. ०२४०-२३८१६३३, २३९२१५१ | पोलीस अधीक्षक, जालना<br>फोन नं. ०२४८२-२२५१००, २२४८३३ | पोलीस अधीक्षक, बीड<br>फोन नं. ०२४४२-२२२३३३, २२२६६६ | पोलीस अधीक्षक, धाराशिव<br>फोन नं. ०२४७२-२२२७००, २२२९०० |
|---|---|---|---|
| १) उपविभागीय पोलीस अधिकारी, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण | १) उपविभागीय पोलीस अधिकारी, जालना | १) उपविभागीय पोलीस अधिकारी, बीड | १) उपविभागीय पोलीस अधिकारी, धाराशिव |
| १ चिकलठाणा | १ सदरबाजार | १ बीड शहर | १ धाराशिव शहर |
| २ करमाड | २ कदिम जालना | २ बीड ग्रामीण | २ धाराशिव ग्रामीण |
| ३ फुलंब्री | ३ तालुका जालना | ३ पेठ बीड | ३ आनंदनगर |
| ४ वडोदबाजार | ४ चंदनझीरा | ४ शिवाजीनगर | ४ बेंबळी |
| २) उपविभागीय पोलीस अधिकारी, पैठण | ५ बदनापुर | ५ पिंपळनेर | २) उपविभागीय पोलीस अधिकारी,तुळजापुर |
| ५ पैठण | २) उपविभागीय पोलीस अधिकारी,अंबड | २) उपविभागीय पोलीस अधिकारी, आष्टी | ५ तुळजापुर |
| ६ एम.आय.डी.सी. पैठण | ६ अंबड | ६ आष्टी | ६ नळदुर्ग |
| ७ पाचोड | ७ घनसावंगी | ७ पाटोदा | ७ तामलवाडी |
| ८ बिडकिन | ८ गोंदी | ८ शिरुर | ३) उपविभागीय पोलीस अधिकारी,उमरगा |
| ३) उपविभागीय पोलीस अधिकारी, सिल्लोड | ९ तीर्थपुरी | ९ अंमळनेर | ८ उमरगा |
| ९ सिल्लोड शहर | ३) उपविभागीय पोलीस अधिकारी, परतुर | १० अंभोरा | ९ मुरुम |
| १० सिल्लोड ग्रामीण | १० परतुर | ३) उपविभागीय पोलीस अधिकारी, गेवराई | १० लोहारा |
| ११ अजिंठा | ११ मंठा | ११ गेवराई | ४) उपविभागीय पोलीस अधिकारी,कळंब |
| १२ सोयगाव | १२ आष्टी | १२ चकलंबा | ११ कळंब |
| १३ फर्दापुर | १३ मौजपुरी | १३ तलवाडा | १२ येरमाळा |
| ४) उपविभागीय पोलीस अधिकारी, कन्नड | १४ सेवली | ४) उपविभागीय पोलीस अधिकारी,माजलगाव | १३ शिराढोण |
| १४ कन्नड शहर | ४) उपविभागीय पोलीस अधिकारी,भोकरदन | १४ माजलगाव शहर | १४ ढोकी |
| १५ कन्नड ग्रामीण | १५ भोकरदन | १५ माजलगाव ग्रामीण | ५) उपविभागीय पोलीस अधिकारी, भुम |
| १६ पिशोर | १६ जाफ्राबाद | १६ सिरसाळा | १५ भुम |
| १७ खुलताबाद | १७ हसनाबाद | १७ दिंद्रुड | १६ परंडा |
| ५) उपविभागीय पोलीस अधिकारी, वैजापुर | १८ पारध | १८ वडवणी | १७ वाशी |
| १८ वैजापुर | १९ टेंभुर्णी | ५) उपविभागीय पोलीस अधिकारी, केज | १८ अंबी |
| १९ विरगाव | | १९ केज | |
| २० शिवुर | | २० धारुर | |
| ६) उपविभागीय पोलीस अधिकारी, गंगापुर | | २१ नेकनुर | |
| २१ गंगापुर | | २२ युसुफवडगाव | |
| २२ शिल्लेगाव | | ६) उपविभागीय पोलीस अधिकारी,अंबाजोगाई | |
| २३ देवगाव रंगारी | | २३ अंबाजोगाई शहर | |
| | | २४ अंबाजोगाई ग्रामीण | |
| | | २५ परळी शहर | |
| | | २६ परळी ग्रामीण | |
| | | २७ संभाजीनगर | |
| | | २८ बर्दापुर | |










# 1. संकेतस्थळ / Website

www.https//igpsambhajinagar.in











## 1. संकेतस्थळ / Website

### इ) माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहितीचे स्वयंप्रकटीकरण

- माहिती अधिकार कलम 4(1)(ख) मधील 17 मुद्यांची माहिती ही त्रैमासीक कालावधीमध्ये कार्यालयाच्या संकेतस्थळावर स्वतंत्र बुकलेट फॉर्ममध्ये अद्यावत करण्यात येते.
- माहिती अधिकारातील व्यापक जनहितार्थ असणारे अर्ज, प्रथम अपीलावरील निर्णय वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येते.

### ई ) सुरक्षितता (Data / Cyber Security)

- संकेतस्थळाची Cyber Security थर्ड पार्टी Host My Code खाजगी कंपनीकडे दिलेले असुन सायबर सिक्युरेटीबाबत देखरेख करण्यात येते.

### उ) लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवा अधिसूचीत करुन ऑनलाईन प्रसिध्द करणे

- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत शासकीय कार्यालये व त्यांचे अधिनस्त असलेल्या विविध कार्यालयामार्फत पात्र नागरीकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, नियत कालमर्यादा, पदनिर्देशीत अधिकारी याबाबतची माहिती संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येते.
- माहिती अधिकारातील अधिनियमांतर्गत जनमाहिती अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी, यांचा तपशील तसेच द्वितीय माहिती अधिकारी यांचा कार्यालयाचा तपशील प्रदर्शित करण्यात येते.

# 2. सुकर जीवनमान / Ease of Living

| | पुर्वीची स्थिती (जुनी) | सद्य स्थिती (नवीन) |
|---|---|---|
| नवीन मोबाईल क्रमांक | ▪ अर्जदार यांनी दिलेल्या तक्रारी अर्जासंबंधी चौकशी करणेकामी पूर्वी स्वत: कार्यालयात हजर होऊन माहिती घेत होते. (तक्रार अर्ज / माहिती अधिकार) | ▪ अर्जदार / तक्रारदार यांना त्यांच्या अर्जाची सध्यास्थिती बाबत माहिती मिळण्याकरिता नवीन स्वतंत्र मोबाईल क्रमांक *9607045353* घेण्यात आलेला आहे. त्याद्वारे त्यांना त्वरीत Call / WhatsApp द्वारे माहिती देण्यात येते.<br>▪ नवीन मोबाईल क्रामांक हा कार्यालयाच्या संकेतस्थळावर देखील प्रसिध्द करण्यात आलेला आहे. |
| चौकशी कक्ष | ▪ तक्रारदार / अभ्यागत पूर्वी कार्यालयात आल्यानंतर त्यांना कोणत्या कार्यासनाकडे काम आहे याची माहिती नसल्याने अभ्यागतांचा वेळ जात होता. | ▪ चौकशी कक्षाची स्थापना केल्यानंतर योग्य मार्गदर्शन व दिशादर्शक फलकाद्वारे संबंधीत कार्यासनाची माहिती कळणे सुलभ झाले आहे. |

## 2. सुकर जीवनमान / Ease of Living

# नागरी सेवांचे सुलभीकरण

**पुर्वी स्थिती (जुनी)**

**सध्यस्थिती (नवीन)**









# 3. स्वच्छता / Cleanliness

## अ) अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण (Sorting & Weeding)

- कार्यालयातील 21401 अभिलेखाचे निंदणीकरण व वर्गीकरण पोलीस नियमावलीनुसार करण्यात आले आहे.
- 5953 कालबाह्य अभिलेख नष्ट करुन नोंदणी करण्यात आलेली आहे.
- सन 2024-25 मध्ये जडसंग्रह नोंदवही अद्यावत करण्यात आलेली असुन जुन्या व निरुपयोगी वस्तूंची विल्हेवाट शासन निर्णयाप्रमाणे करण्यात आलेली आहे.
- कार्यालय व परिसराची संपुर्ण साफसफाई ही श्रमदानाने अधिकारी / अंमलदार यांचेकडून करण्यात येते.
- ओला व सुका कचऱ्यासाठी स्वतंत्र डस्टबीनची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

पुर्वी स्थिती (जुनी)



सद्यस्थिती (नवीन)




# 4. तक्रारीचे निवारण

- आपले सरकार व पी.जी. पोर्टलवरील दि.31.03.2025 पुर्वीच्या सर्व तक्रारींचे निराकरण करण्यात आले असून सर्व तक्रारीची माहिती **निरंक** आहे.
- प्राप्त तक्रारी अर्जांपैकी परिक्षेत्रामध्ये वेळोवेळी आढावा घेऊन सदर कालावधी मध्ये 6136 तक्रारी अर्जाची निर्गती करण्यात आलेली आहे.
- परिक्षेत्रामध्ये विभागीय चौकशीचे (D.E.) 03 प्रकरणे व प्राथमिक चौकशीचे (P.E.) 03 प्रकरणे प्रलंबित आहे.
- बदली संदर्भाने फक्त 2 प्रकरणे मा.न्यायालयात प्रलंबित आहेत.
- प्रवेशद्वारावराजवळ भेटीच्या वेळाचे फलक लावण्यात आलेले आहे.

आपले सरकार




तक्रारींची स्थिती



Ageing Report (In Days)

| Department | Desk | 0-7 | 8-14 | 15-21 | 21+ | Total Pendency |
|---|---|---|---|---|---|---|
| Home-Police | Inspector General Of Police,Chhatrapati Sambhajinagar | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| Total Pendency | | 0 | 0 | 0 | 0 | 0 |

भेटीचा फलक



# 5. कार्यालयीन सोयी सुविधा (Amenities)

## कार्यालयीन सोयी सुविधा

- अभ्यागत  व कार्यालयीन अधिकारी / कर्मचारी यांचेकरिता स्वतंत्र RO द्वारे स्वच्छ पाणी व स्वच्छ प्रसाधन गृहाची व्यवस्था करण्यात आलेली आहे
- अभ्यागत प्रतिक्षालयात सोफा, टी-टेबल, थंड व गरम पिण्याचे पाणी, मासीक व इतर दैनंदिन वृत्तपत्राची व्यवस्था करण्यात आलेली आहे.
- कार्यालयामध्ये सुव्यवस्थीत दिशादर्शक व नामफलक लावण्यात आलेले आहे.
- कार्यालयातील वातावरण आल्हाददायक होणेकरिता आकर्षक रोपे व वृक्षांची लागवड करण्यात आलेली आहे.
- कार्यालय परिसरात सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे आरोग्य उत्तम राहणेकरिता व्यायामशाळा तयार करण्यात आलेली असून 24 तास उपलब्ध ठेवण्यात आलेली आहे.

# 5. कार्यालयीन सोयी सुविधा (Amenities)

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

## अभ्यागत कक्ष






## कार्यालयीन सौंदर्यीकरण

# 5. कार्यालयीन सोयी सुविधा (Amenities)

## दिशादर्शक फलक






व्यायामशाळा

# 5. कार्यालयीन सोयी सुविधा (Amenities)






# 6. क्षेत्रीय कार्यालयांना भेटी

अ. आठवडयातुन किमान 2 दिवस क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देवुन पाहणी करणे.

- सदर कालावधीमध्ये 04 पोलीस अधीक्षक कार्यालय, 08 उपविभाग, (कन्नड, पैठण, अंबड, जालना, बीड, आष्टी, उमरगा, कळंब), 08 पो.स्टे.,(फुलंब्री, गंगापूर, गोंदी, तालुका जालना, बीड शहर, नेकनूर, कळंब, उमरगा) 04 पोलीस अधीक्षक कार्यालय अंतर्गत सर्व शाखा / विभाग यांना भेटी देण्यात आलेल्या आहेत.
- 04 पोलीस अधीक्षककार्यालय, 08 SDPO व 8 PS स्तरावर असे एकुण 20 दरबार घेऊन अधिकारी / कर्मचा-यांच्या अडीअडचणी सोडविण्यात आलेल्या आहेत.
- उप विभागीय पोलीस अधिकारी व पोस्टे प्रभारी अधिकारी हे गाव भेटी दरम्यान सरपंच, पोलीस पाटील व प्रतिष्ठित नागरिक यांची बैठक घेवुन गावामध्ये अवैध धंदे चालणार नाही तसेच गावातील महत्वाच्या ठिकाणी CCTV कॅमेरे लावणेबाबत सुचित करण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यावरून परिक्षेत्रात सदर कालावधीमध्ये 2817 CCTV कॅमेरे गाव पातळीवर महत्वाचे ठिकाणी लावण्यात आले आहेत.









## 7. ई ऑफीस प्रणाली / E-Office

- दिनांक 15/08/2023 रोजी कार्यालयात ई-ऑफीस प्रणालीद्वारे कामकाज करण्यास सुरूवात केलेली आहे.
- याव्दारे वरिष्ठ कार्यालयाकडून प्राप्त पत्रव्यवहार आवक विभागामध्ये नोंद घेवून परिक्षेत्रा अंतर्गत घटक कार्यालयांना पाठविण्यात येते. ई-ऑफीस प्रणालीव्दारे गोपनिय, वैद्यकिय देयक, मा.न्यायालयीन प्रकरणे वगळता इतर सर्व टपाल ई-ऑफीस व्दारे संबंधीत कार्यालयांना पाठविण्यात येते.
- सदर कालावधीमध्ये ई-ऑफीस प्रणालीचा वापर करून खालील प्रमाणे पत्र व्यवहार करण्यात आला आहे.

| आवक | ई-ऑफीस व्दारे प्राप्त |
|---|---|
| दि.07/01/2025 ते 15/04/2025 | 2630 |
| **जावक** | **ई-ऑफीस व्दारे प्राप्त रवाना** |
| दि.07/01/2025 ते 15/04/2025 | 1615 ( कार्यवाही करुन निकाली -96%)<br>912 ( माहितीस्तव पत्र ) |

विशेष पोलीस महानिरीक्षक ⇄ कार्यालय अधीक्षक ⇄ प्रमुख लिपीक

# 8. आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन

- परिक्षेत्रामध्ये सुरु असलेले एकुण 115 पवन ऊर्जा व सौर ऊर्जा प्रकल्पांना पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात सुरु असलेले नवीन उद्योग प्रकल्पांना महिन्यात एकदा भेटी देणे बंधनकारक केले असुन ते भेटी दरम्यान उद्योजकांचे अडीअडचणी समजुन त्यांना सहकार्य करावे व त्यांच्या तक्रारीवरुन कायदेशीर कार्यवाही करण्याबाबत सुचित केले आहे.
- दि.28.01.2025 रोजी जिल्हा बीड व दि.29.01.2025 रोजी जिल्हा धाराशिव येथील सौरउर्जा व पवनउर्जा प्रकल्पाचे अधिकारी यांचेसोबत पोलीस अधीक्षक कार्यालय येथे बैठक घेऊन चर्चा करुन त्यांना सुरक्षाविषयक मार्गदर्शनपर सुचना देण्यात आलेल्या आहेत.
- दि.08.03.2025 रोजी परिक्षेत्रामधील सर्व गुंतवणूकदार, उद्योजक व प्रकल्पाधिकारी यांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यांच्या अडीअडचणीचे निराकरण करण्यासाठी विभागीय स्तरावर विशेष पोलीस महानिरीक्षक, विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांची मिटींग घेण्यात आलेली आहे.
- दि.15.04.2025 रोजी जालना येथील उद्योजकांची बैठक घेऊन चर्चा करुन त्यांच्या अडीअडचणी समजुन त्यांना मार्गदर्शनपर सुचना देण्यात आलेल्या आहेत.
- परिक्षेत्रातील SDPO यांची नोडल अधिकारी म्हणुन नेमणूक केली असून त्यांचे संपर्क क्रमांक संबंधीतास देण्यात आले आहे.

# ८. आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन



परिक्षेत्रातील पवनऊर्जा प्रकल्प भेट



उद्योजक बैठक



सौरऊर्जा / पवनऊर्जा प्रकल्प अधिकारी बैठक

# 9. कृत्रीमबुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI)

## अधिकारी / कर्मचारी प्रशिक्षण सेवा विषयक बाबी आणि कृत्रीमबुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI)

- परिक्षेत्रा अंतर्गत दि.08/04/2025 व दि.09/04/2025 रोजी Cyber Shield 2025 अंतर्गत AI In Policing, Strengthening Cyber Hygiene, Crime Prevention And OSINT या विषयावर 1) अमित दुबे National Cyber Security Expert Delhi 2) विजयंत गौर Director General Cyber Security Association Of India 3) प्रो. अमोल वराड CISO, NSBT 4) दिपक पटेल Crypto Expert तज्ञांद्वारे कार्यशाळा आयोजित करून परिक्षेत्रातील 50 अधिकारी व 200 पोलीस अंमलदार यांना दैनंदिन पोलीस कार्यामध्ये AI चे वापराबद्दल Practical Training व Demo देण्यात आले आहे.
- पोलीस संशोधन आणि विकास ब्युरो, केंद्रीय पोलीस प्रशिक्षण अकादमी,भोपाळ यांचे दि.10.01.2025 रोजी बाल न्याय विषयक पहिले राष्ट्रीय चर्चा सत्र (Seminar) एक दिवसीय प्रशिक्षणास परिक्षेत्रातील दोन पोलीस निरीक्षक तसेच संचालक, सेंट्रल डिटेक्टिव्ह ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, जयपूर यांचे दि.06.03.2025 रोजी Paper Leak Case/Challenges of Conducting CBT या विषयाचे एक दिवसीय प्रशिक्षण एक सपोनि यांना देण्यात आले आहे.
- परिक्षेत्रात *81* वरीष्ठ व कनिष्ठ श्रेणी लिपीक यांचे सेवांतर्गत प्रशिक्षण पुर्ण केले आहे.

# 9. कृत्रीमबुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI)



# ग्रामीणचे २५० अधिकारी, कर्मचारी झाले अपडेट

## तपासासाठी घेणार एआयचीही मदत : तज्ज्ञांनी दिले सायबर प्रशिक्षण

**छत्रपती संभाजीनगर : सायबर गुन्हेगाराच्या पुढे पोलीस असले पाहिजेत. सायबर पोलिसिंगमध्ये एआय टेक्नॉलॉजीचा वापर कसा करता येईल, याबाबत ४० अधिकारी व २०० अंमलदारांना तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. एआयची व्याप्ती आपल्या आवाक्याबाहेर जाण्यापूर्वी एआय समजून घ्या आणि तपासात त्याचा वापर करा, असे मत मार्गदर्शन करणाऱ्या तज्ज्ञांनी व्यक्त केले.**

सायबर तज्ज्ञांचे आयजी वीरेंद्र मिश्र, एसपी डॉ. विनयकुमार राठोड, अपर अधीक्षक अन्नपूर्णा सिंह यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले.

सायबर शिल्ड ही संकल्पना राबवून ८ व ९ एप्रिल अशी दोनदिवसीय कार्यशाळा नाथ स्कूल ऑफ बिझनेस आणि टेक्नॉलॉजी, सायबर सुरक्षा फोरम यांच्या सौजन्याने मासिआच्या सभागृहात पार पडली. यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांची उपस्थिती होती. सायबर गुन्ह्याचा तपास, त्यांना प्रतिबंध करणे, गुन्हे उघडकीस आणणे, नागरिकांमध्ये जनजागृती करणे, सायबर गुन्ह्याचा तपास करताना गुन्ह्यांची मुख्य पद्धती तसेच तपास प्रक्रियेत लागणारे विविध टूल्स, डिजिटल पुरावे गोळा करणे, सायबर पोलिसिंगमध्ये कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर (एआय), सायबर सुरक्षा बळकट करणे, गुन्हेगारी प्रतिबंध, ओपन सोर्स इंटिलिजन्स वापर, या विषयावार आधारित ही कार्यशाळा होती.

या कार्यशाळामध्ये नॅशनल सायबर सेक्युरिटी एक्सपर्ट अमित दुबे, क्रिप्टो एक्सपर्ट दिपक पटेल, सायबर सेक्युरिटी असोसिएशन ऑफ इंडियाचे डायरेक्टर जनरल विजयंत गौर, प्रा. अमोल वराडे यांनी मार्गदर्शन व प्रशिक्षण दिले.


यावेळी अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह, सहायक पोलीस अधीक्षक मयंक माधव, सिद्धार्थ बारवाल, प्रशिक्षणार्थी उपअधीक्षक पूजा पवार यांची उपस्थिती होती. कार्यशाळा यशस्वीतेसाठी उपअधीक्षक विष्णू भोये, महादेव गोमारे, सहायक निरीक्षक योगेश धोंडे, जगदीश राऊत, सचिन पंडित, कोमल शिंदे, उपनिरीक्षक संतोष मरळ, मनीषा जोगदंड, अंमलदार संदीप वरपे, गणेश घोरपडे, राजेश राठोड, योगेश मोईम, संतोष तांदळे, अर्जुन जंगाळे, अमित कुलकर्णी यांनी विशेष परिश्रम घेतले.

### सायबर गुन्ह्यांचे प्रकार

ओटीपी, यूपीआय, क्यूआर कोड स्कॅन द्वारे पैसे काढणे, फिशिंग : बनावट वेबसाइट्स, ईमेल्स, मेसेजेसद्वारे लॉगिन माहिती मिळवणे, व्हॉट्सॲप / एसएमएसवर लिंक पाठवून अकाउंट ताब्यात घेणे, सिम स्वॅप : बँक खाते हॅक करण्यासाठी सिमकार्ड ट्रान्सफर करणे, फेक कर्ज ॲपद्वारे नागरिकांकडून सर्व माहिती मिळवून ब्लॅकमेलिंग करणे, बनावट ओळखी तयार करून मैत्री/नोकरीच्या नावाखाली फसवणूक, एआय आणि डिपफेक वापरून बनावट व्हिडीओ/व्हॉईस कॉल्स तयार केले जात आहेत, क्रिप्टोकरन्सीच्या नावाखाली गुंतवणूक फसवणूक .

### या बाबींचे दिले प्रशिक्षण

1. सायबर गुन्ह्यांचे स्वरूप समजुन घेणे. सायबर गुन्हयांचे प्रकार व केस स्टडीज, एआयचे नवीन तंत्रज्ञान, क्वांटम संगणक, पोलीस विभाग तंत्रज्ञाचा वापर, सायबर सुरक्षा बळकटीकरण.
2. आयपी अड्रेस, व्हीपीएन, आभासी क्रमांक, मजबूत पासवर्ड, फिशिंग, सुरक्षित ब्राउझिंग, सुरक्षित डिव्हाईस सिस्टम सेटिंग, सोशल मिडीया सेटिंग, ऑनलाईन फसवणूक जनजागृती, सायबर गुन्हे तपासाचे तंत्र, डेटा सुरक्षा, डीपीडी, ओपन सोर्स इंटिलिजन्स, ब्लॉकचेन आणि क्रिप्टो.
3. प्रशिक्षणामुळे पोलिस डिजिटल पुरावे कसे गोळा करायचे, जतन करायचे आणि न्यायालयात कसे सादर करायचे याचे शास्त्रशुद्ध पद्धतीने शिकल्यामुळे डिजिटल पुराव्यांची योग्य हाताळणी करता येईल.






# 10. नाविन्यपुर्ण उपक्रम

1) परिक्षेत्रातील अवैध धंदयाचे समूळ उच्चाटन होण्यासाठी SDPO यांना मागील पाच वर्षात जुगार व दारूबंदी (5 हजार रूपयापेक्षा जास्त मुददेमाल असलेले गुन्हे), पीटा ॲक्ट, एनडीपीएस, ईसी ॲक्ट, गुटखा व अवैध कत्तलखाने बाबत दाखल गुन्हयांचे घटनास्थळांना भेटी देवून चेक करणेबाबत आदेशीत करण्यात आले होते. एकूण 7582 घटनास्थळांपैकी 6696 गुन्हयांच्या घटनास्थळाला भेटी देवून चेक करण्यात आलेले आहे. चकिंग दरम्यान 141 गुन्हयांच्या घटनास्थळी पुन्हा अवैध धंदे करतांना इसम मिळून आले असून त्यांच्यावर कायदेशिर कार्यवाही करुन 01 कोटी, 83 लाख, 6 हजार, 497 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सदर उपक्रम परिक्षेत्रामध्ये भविष्यात देखील सुरू राहणार आहे.

## Special IG mandates SDPOs to revisit raided locations to prevent revival of illicit activities

Mohammed.Akhef
@timesofindia.com

**Chhatrapati Sambhajinagar**: Special inspector general (IG) of Chhatrapati Sambhajinagar Range Virendra Mishra has mandated that all sub-divisional police officers (SDPOs) within his jurisdiction compulsory visit locations raided for illegal activities over the past five years.

The range has jurisdiction over Chhatrapati Sambhajinagar rural, Jalna, Beed, and Dharashiv districts, with six, four, six, and five divisions, respectively.

The move is aimed at preventing revival of illicit businesses and simultaneously convey a message to those associated with these activities that they are still on the police's radar, Mishra said.

"It is our observation that particular types of illicit businesses are carried out by habitual offenders at the same places where they faced legal action by the police. Revisiting these places prevents revival of illicit activities and helps our officers with area familiarisation," said Mishra, who has given a seven-point chart for each of the SDPOs to follow in this regard and submit a monthly report.

He clarified that as far as liquor and gambling cases are concerned, the SDPOs will visit only the spots where articles worth over Rs 5000 were seized.

As part of this initiative, SDPOs have been instructed to prepare a comprehensive database of all locations raided for offenses ranging from gambling and illegal liquor sales to narcotics under the NDPS (Narcotic Drugs and Psychotropic Substances) Act.

These officers are expected to maintain regular surveillance of these sites, ensuring they remain free of illegal activities.

Between Jan 2020 and Dec 2024, in the range, Chhatrapati Sambhajinagar rural police carried out 31 raids against flesh trades and sex rackets, 23 in Beed, 16 in Jalna and 15 in Dharashiv.

During the same period, Sambhajinagar rural carried out 652 raids at gambling dens, 394 in Beed, 468 in Jalna, and 432 in Dharashiv.

Against illicit liquor and bootlegging, Sambhajinagar rural police carried out 766 raids, 960 in Beed, 933 in Jalna, and 206 in Dharashiv.

Sambhajinagar rural carried out 66 raids, 14 in Beed, 58 in Jalna, and 11 in Dharashiv against siphoning and diversion of ration meant for below poverty line.

Sambhajinagar rural carried out 47 raids, Beed 33, Jalna 65, and Dharashiv 27 raids against narcotics and psychotropic substances during these five years.

In the action against Gutkha, Sambhajinagar rural police carried out 128 raids, Beed 167, Jalna 178, and Dharashiv 111.

"The directive aims to ensure that gambling dens, narcotics hubs, and other illegal enterprises do not re-establish operations at these spots," said Chhatrapati Sambhajinagar SP Vinaykumar Rathod. The officer said that the IGP's move is part of a broader strategy to maintain law and order in the region as this exercise will act as a deterrent and send a strong message to those involved in illicit businesses that police have remained vigilant even years after action was taken.



# 10. नाविन्यपुर्ण उपक्रम

2) **सेक्युरिटी ऑडिट** :- गुंतवणूकदार उद्योजकांची सुरक्षा बळकट करुन पोषक वातावरण निर्माण करण्यासाठी व त्यांच्या अडीअडचणीचे निराकरण करण्यासाठी दि.15.03.2025 नंतर 58 मुद्यांचे सेक्युरिटी ऑडिट फॉर्म तयार करण्यात आला आहे. सदर फॉर्म पो.स्टे. प्रभारी अधिकारी यांना पाठविण्यात येवून पवनउर्जा व सौरउर्जा प्रकल्पांना भेटी देवून सुरक्षेच्या दृष्टीने सेक्युरिटी ऑडिट करण्याबाबत आदेशित करण्यात आले होते. त्यावरुन परिक्षेत्रातील 115 पवनउर्जा व सौरउर्जा प्रकल्पांना भेटी देण्यात आल्या असून त्यांचे सेक्युरिटी ऑडिट करण्यात आले. तसेच पो.स्टे. प्रभारी अधिकारी यांना सुरक्षेच्या अनुषंगाने लेखी सुचना देवून उपाययोजना करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.






# thank you

विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र,
छत्रपती संभाजीनगर.